जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# ऊर्जा स्वावलंबनाकडे वाटचाल

भारताने ऊर्जा स्वावलंबनाकडे वाटचाल करताना जैवइंधन मोहिमेला दिलेली गती ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. जागतिक पातळीवरील भू-राजकीय संघर्ष, इंधनाच्या वाढत्या किंमती आणि होर्मुझ सामुद्रधुनीसारख्या संवेदनशील मार्गांवरील अस्थिरतेमुळे भारतासमोर ऊर्जा सुरक्षेचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत पेट्रोल-डिझेलवरील परावलंबित्व कमी करण्यासाठी जैवइंधन हा प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत आहे. मात्र, ही मोहीम अधिक शाश्वत आणि देशहिताची बनवायची असेल तर सरकारने अन्नधान्यावर आधारित इथेनॉल उत्पादनाऐवजी शेती कचऱ्यावर आधारित जैवइंधनाकडे निर्णायक वळण घेणे आवश्यक आहे. आजपर्यंत सरकारने ऊस, मका आणि इतर अन्नधान्य पिकांपासून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन दिले. या धोरणामुळे इंधन निर्मितीला चालना मिळाली असली, तरी त्याचे काही गंभीर दुष्परिणामही समोर आले आहेत. अन्नधान्य पिकांसाठी मोठ्या प्रमाणावर रासायनिक खतांची आवश्यकता असते. विशेषतः युरियासारख्या खतांची आयात करण्यासाठी देशाला अब्जावधी रुपयांचा खर्च करावा लागतो. परिणामी, एका बाजूला आयातीत कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न होत असताना दुसऱ्या बाजूला खतांच्या आयातीवरील खर्च वाढत आहे. त्यामुळे जैवइंधन मोहिमेचा मूळ उद्देशच काही प्रमाणात कमकुवत होताना दिसतो. यावर सर्वात प्रभावी उपाय म्हणजे शेती कचऱ्यावर आधारित जैवइंधन निर्मिती. भारतात दरवर्षी ५० कोटी टनांहून अधिक शेती कचरा तयार होतो. ऊसाच्या बगॅसपासून ते भाताच्या पेंढ्यापर्यंत आणि मक्याच्या कणसांपासून ते कापसाच्या पराट्यांपर्यंत मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेला हा कचरा आजही बहुतांश वेळा जाळून टाकला जातो. यामुळे वायुप्रदूषण वाढते, जमिनीची सुपीकता घटते आणि पर्यावरणावर दुष्परिणाम होतात. मात्र, याच कचऱ्यापासून इथेनॉल, बायोगॅस आणि शाश्वत विमान इंधन तयार करता येणे शक्य झाले आहे. हीच बाब भारतासाठी मोठी संधी ठरू शकते. कचऱ्यावर आधारित बायो-रिफायनरी ही केवळ इंधन निर्मितीची केंद्रे नसून ती ग्रामीण अर्थव्यवस्थेची नवी उर्जा ठरू शकतात. या प्रक्रियेतून तयार होणारे इथेनॉल पेट्रोलमध्ये मिश्रित करून आयातीत इंधनावरील अवलंबित्व कमी करता येईल. त्याचबरोबर बायोगॅस निर्मितीनंतर उरणारी मळी ही उत्कृष्ट सेंद्रिय खत म्हणून वापरता येते. यामुळे मातीची सुपीकता वाढते आणि रासायनिक खतांवरील खर्च कमी होतो. सरकारला दरवर्षी द्यावे लागणारे प्रचंड खत अनुदानही मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. सेंद्रिय खतांच्या वापरामुळे जमिनीचा कस टिकून राहील आणि पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होईल. भारतीय तंत्रज्ञान संस्था आणि विविध संशोधन संस्थांनी लिग्नोसेल्युलोसिक बायोमासपासून इथेनॉल तयार करण्याचे अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित केले आहे. पिकांचे अवशेष, लाकडाचा भुसा आणि इतर कृषी कचऱ्यापासून इंधन निर्मिती करण्यासाठी एन्झाइम्सच्या साहाय्याने प्रगत प्रक्रिया विकसित करण्यात आली आहे. देशात पानिपतसह अनेक ठिकाणी टू-जी इथेनॉल प्रकल्प सुरू झाले आहेत. हे प्रकल्प केवळ इंधन उत्पादनापुरते मर्यादित नसून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देत आहेत. याशिवाय, केंद्र सरकारच्या 'एसएटीएटी' योजनेअंतर्गत ग्रामीण भागात संकुचित बायोगॅस प्रकल्प उभारले जात आहेत. प्रक्रियेद्वारे शेती कचऱ्यापासून मिथेन वायू वेगळा करून त्याचा वाहन आणि उद्योगांमध्ये इंधन म्हणून वापर केला जात आहे. ही प्रक्रिया पर्यावरणपूरक असून ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीलाही चालना देणारी आहे. विमान वाहतूक क्षेत्रातही भारताने शाश्वत विमान इंधनाच्या निर्मितीत उल्लेखनीय प्रगती केली आहे. शेती कचऱ्यापासून तयार होणारे हे इंधन भविष्यात आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. जागतिक स्तरावर कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी शाश्वत विमान इंधनाचा वापर बंधनकारक होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत भारताने वेळेवर घेतलेली ही दिशा देशाला जागतिक ऊर्जा क्षेत्रात आघाडीवर नेऊ शकते. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेला यशस्वी करण्यासाठी सरकारने केवळ धोरण जाहीर करून थांबता कामा नये. वाहन उत्पादकांना इथेनॉल मिश्रित इंधनासाठी अनुकूल इंजिन तयार करण्यास प्रोत्साहन द्यावे लागेल. ग्राहकांनाही या पर्यायाचे आर्थिक आणि पर्यावरणीय फायदे पटवून द्यावे लागतील. खासगी क्षेत्राची गुंतवणूक वाढवून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर बायो-रिफायनरी उभारण्याची गरज आहे. ऊर्जा सुरक्षा, अन्न सुरक्षा आणि पर्यावरण संरक्षण या तिन्ही उद्दिष्टांचा समतोल राखणारे धोरणच भारताला खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर बनवू शकते. शेती कचऱ्यावर आधारित जैवइंधन ही केवळ ऊर्जा निर्मितीची संकल्पना नसून ती ग्रामीण विकास, पर्यावरण संवर्धन आणि आर्थिक स्वावलंबन यांचा संगम आहे. त्यामुळे आता वेळ आली आहे ती अन्नधान्यापासून इंधनाकडे नव्हे, तर कचऱ्यापासून समृद्धीकडे वाटचाल करण्याची.

# समाजवादी विचारवंत : साने गुरुजी



आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणा-पासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता.

श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सद्भावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली.

प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले.

नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते. त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला. त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले. दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो...या गीताने तरुणांना स्फुरण चढले. या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली.

साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नां-मुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले.

स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाज-वादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# खेळ : आनंद आणि विकासाचा उत्सव

११ जून हा दिवस संपूर्ण जगभरात 'आंतरराष्ट्रीय खेळ दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने २०२४ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता देत खेळाच्या माध्यमातून बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा महत्त्वपूर्ण संदेश दिला. खेळ ही केवळ करमणूक नसून ती बालकांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासाची एक अत्यावश्यक प्रक्रिया आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात खेळाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. बालकांच्या जीवनातील आनंद, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी खेळाची आवश्यकता आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय खेळ दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून मानवी विकासाच्या मूलभूत हक्कांचा आणि मूल्यांचा गौरव करणारा दिवस आहे.

खेळ हा प्रत्येक बालकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बालहक्क करारातील कलम ३१ नुसार प्रत्येक बालकाला विश्रांती, खेळ, मनोरंजन आणि सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार आहे. तथापि, जगातील अनेक बालके गरिबी, युद्धस्थिती, बालमजुरी, शिक्षणातील असमानता, सुरक्षित खेळाच्या जागांचा अभाव आणि सामाजिक विषमता यांमुळे या हक्कापासून वंचित राहत आहेत. वाढते शहरीकरण आणि तंत्रज्ञानाचा अतिरेक यामुळेही बालकांच्या खेळण्याच्या संधी कमी होत आहेत. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय खेळ दिन समाजाला खेळाच्या हक्काची आठवण करून देतो आणि बालकांना सुरक्षित, मुक्त आणि सर्वसमावेशक वातावरण उपलब्ध करून देण्याचे आवाहन करतो.



बालकांच्या शारीरिक विकासात खेळाचे योगदान अनन्यसाधारण आहे. धावणे, उड्या मारणे, सायकल चालविणे, पोहणे, चेंडूचे विविध खेळ आणि इतर शारीरिक हालचालींमुळे स्नायू बळकट होतात, शरीरातील समन्वय वाढतो आणि आरोग्य उत्तम राहते. नियमित खेळामुळे लठ्ठपणा, मधुमेह, हृदयरोग यांसारख्या जीवनशैलीशी संबंधित समस्यांचा धोका कमी होतो. लहानपणापासून सक्रिय जीवनशैलीची सवय लागल्यास निरोगी भवितव्याची पायाभरणी होते. सध्याच्या काळात मोबाइल, दूरदर्शन आणि संगणकासमोर वाढता वेळ घालवल्यामुळे मुलांच्या शारीरिक हालचालींमध्ये घट होत आहे. परिणामी आरोग्याशी संबंधित विविध समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे मैदानी खेळांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

खेळ मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही तितकाच महत्त्वाचा आहे. खेळताना मुलांमध्ये आनंद, उत्साह आणि समाधानाची भावना निर्माण होते. विविध परिस्थितींना सामोरे जाताना समस्या सोडविण्याची क्षमता, निर्णयक्षमता आणि विचारशक्ती विकसित होते. जिंकण्याचा आनंद आणि पराभवाचा स्वीकार या दोन्ही अनुभवांमधून मुलांमध्ये मानसिक स्थैर्य निर्माण होते. आज अनेक मुले अभ्यासाचा ताण, स्पर्धेचे दडपण आणि सामाजिक अपेक्षांमुळे मानसिक तणावाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत खेळ हा तणाव-मुक्तीचा प्रभावी मार्ग ठरतो. खेळामुळे आत्मविश्वास वाढतो आणि जीवनातील आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाण्याची तयारी होते.

शाळा आणि शैक्षणिक संस्थांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकदा परीक्षाकेंद्रित शिक्षणपद्धतीमुळे खेळाला दुय्यम स्थान दिले जाते. परिणामी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या संधी मर्यादित होतात. खेळ हा शिक्षणाचा अविभाज्य भाग मानून शाळांमध्ये पुरेशा सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रशिक्षित क्रीडाशिक्षकांची नियुक्ती, विविध खेळांचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार उपक्रमांची आखणी यांमुळे खेळ संस्कृतीला चालना मिळू शकते. शिक्षण आणि खेळ यांचा समतोल राखल्यास विद्यार्थी अधिक सक्षम, आत्मविश्वासू आणि जबाबदार नागरिक बनू शकतात.

पालकांची मानसिकता बदलणेही तितकेच आवश्यक आहे. अनेक पालक मुलांच्या शैक्षणिक यशाला प्राधान्य देऊन खेळाला वेळेचा अपव्यय समजतात. मात्र, खेळ हा मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यावश्यक आहे. पालकांनी मुलांना खेळण्यासाठी वेळ उपलब्ध करून देणे, त्यांच्या आवडी-निवडी समजून घेणे आणि विजय-पराजयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्यास प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. मुलांसोबत खेळात सहभागी झाल्यास कौटुंबिक नातेसंबंध अधिक दृढ होऊ शकतात.

लिंगभाव समानतेच्या दृष्टीने खेळाचे महत्त्व विशेष आहे. अनेक ठिकाणी मुलींच्या खेळातील सहभागावर विविध सामाजिक बंधने असतात. सुरक्षिततेचा अभाव, सुविधांची कमतरता आणि रूढीवादी विचारसरणी यांमुळे मुलींना खेळाच्या समान संधी मिळत नाहीत. मात्र, खेळामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास वाढतो, नेतृत्वगुण विकसित होतात आणि सक्षमीकरणाची प्रक्रिया वेगाने घडते. त्यामुळे मुला-मुलींना समान संधी उपलब्ध करून देणे ही समाजाची जबाबदारी आहे.

आंतरराष्ट्रीय खेळ दिनाच्या निमित्ताने आपण खेळाकडे नव्या दृष्टीकोनातून पाहण्याची गरज आहे. खेळ हा केवळ स्पर्धा जिंकण्याचे साधन नसून जीवनमूल्ये विकसित करणारी प्रक्रिया आहे. प्रामाणिकपणा, शिस्त, संघभावना, चिकाटी आणि नेतृत्व यांसारखे गुण खेळातून विकसित होतात. प्रत्येक बालकाला सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात खेळण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, स्वयंसेवी संस्था, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे खेळपूरक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

शहरीकरणाच्या वाढत्या प्रक्रिये-मुळे खेळाच्या मैदानांची संख्या कमी होत आहे. उंच इमारती, वाहतुकीची समस्या आणि सार्वजनिक जागांचा अभाव यांमुळे मुलांच्या खेळण्याच्या संधी मर्यादित होत आहेत. त्यामुळे शहरांच्या नियोजनामध्ये खेळाच्या मैदानांना आणि उद्यानांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. सुरक्षित आणि सुलभ सार्वजनिक जागा निर्माण झाल्यास बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.

प्रौढ व्यक्तींसाठीही खेळाचे महत्त्व कमी नाही. नियमित व्यायाम, मनोरंजनात्मक क्रीडा आणि शारीरिक उपक्रम यांमुळे तणाव कमी होतो, सामाजिक संबंध दृढ होतात आणि जीवनमान सुधारते. आजच्या धकाधकीच्या जीवनात निरोगी राहण्यासाठी खेळाची गरज अधिक वाढली आहे. त्यामुळे खेळ ही केवळ बालपणापुरती मर्यादित बाब नसून जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात महत्त्वपूर्ण ठरते.

आंतरराष्ट्रीय खेळ दिन हा प्रत्येकाला बालपणातील आनंदाची आठवण करून देणारा दिवस आहे. मातीमध्ये खेळण्याचा आनंद, मित्रांसोबत धावण्याची उत्सुकता, संघाने जिंकलेल्या सामन्याचे समाधान आणि पराभवानंतर पुन्हा उभे राहण्याची जिद्द हे सर्व अनुभव जीवन समृद्ध करतात. खेळ माणसाला अधिक संवेदनशील, सहकार्यशील आणि सकारात्मक बनवतो.

आजच्या काळात मुलांना खेळासाठी वेळ आणि जागा उपलब्ध करून देणे ही एक सामाजिक जबाबदारी बनली आहे. अभ्यास, स्पर्धा आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावामध्ये बालपण हरवू नये यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. खेळ हा मुलांच्या आनंदाचा, आरोग्याचा आणि विकासाचा अविभाज्य भाग आहे. म्हणूनच प्रत्येक बालकाला मुक्तपणे खेळण्याचा अधिकार मिळावा आणि त्या अधिकाराचे संरक्षण व्हावे, यासाठी समाजाने सजग राहणे गरजेचे आहे.

आंतरराष्ट्रीय खेळ दिन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की खेळ ही चैनीची गोष्ट नसून मानवी विकासाची मूलभूत गरज आहे. खेळामधून निर्माण होणारा आनंद, आत्मविश्वास, मैत्री, शिस्त आणि सहकार्याची भावना समाजाला अधिक सुदृढ बनवते. त्यामुळे बालकांपासून प्रौढांपर्यंत प्रत्येकाने आपल्या जीवनात खेळासाठी स्थान निर्माण केले पाहिजे.

खेळ म्हणजे जीवनातील उत्साहाचा झरा, सर्जनशीलतेचा अविष्कार आणि आरोग्यपूर्ण समाजाच्या निर्मितीचे प्रभावी साधन होय. आंतरराष्ट्रीय खेळ दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येक बालकाच्या खेळण्याच्या हक्काचा आदर करूया, मैदाने जपूया, खेळ संस्कृतीला प्रोत्साहन देऊया आणि निरोगी, आनंदी, समावेशक समाज घडविण्याच्या दिशेने वाटचाल करूया. कारण खेळ ही केवळ विरंगुळ्याची कृती नाही; ती मानवतेचा उत्सव आहे, आनंदाचा श्वास आहे आणि उज्ज्वल भविष्याची आशादायी सुरुवात आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
नांदेड

# पेट्रोलची किंमत आणि भारतीयांची क्रयशक्ती

भारतात पेट्रोलच्या वाढत्या किमतींबाबत चर्चा नेहमीच होत असते. सरकारे बदलतात, जागतिक बाजारातील परिस्थिती बदलते, कच्च्या तेलाचे दर वर-खाली होतात; परंतु सामान्य नागरिकासाठी पेट्रोलची किंमत हा कायमच चिंतेचा विषय राहिला आहे. मात्र पेट्रोल महाग आहे की स्वस्त, याचे खरे मोजमाप केवळ प्रति लिटर किंमतीवरून होत नाही. त्या देशातील नागरिकांच्या उत्पन्नाच्या तुलनेत पेट्रोल किती परवडणारे आहे, हा अधिक महत्त्वाचा निकष असतो. याच निकषावर भारताची स्थिती चिंताजनक असल्याचे आंतरराष्ट्रीय आकडेवारीतून स्पष्ट होते.

भारतातील दरडोई दैनिक उत्पन्न सुमारे ७.७० डॉलर इतके आहे. विकसित देशांच्या तुलनेत हे उत्पन्न अत्यंत कमी आहे. त्यामुळे पेट्रोलची किंमत आंतरराष्ट्रीय स्तरावर फारशी जास्त नसली तरी भारतीय नागरिकांना त्यासाठी आपल्या उत्पन्ना-चा मोठा हिस्सा खर्च करावा लागतो. अमेरिकेत एका व्यक्तीला महिन्याला ४० लिटर पेट्रोल खरेदी करण्यासाठी केवळ ०.६ टक्के उत्पन्न खर्च करावे लागते, तर युरोपमध्ये हा खर्च १ ते २ टक्क्यांच्या आसपास आहे. भारतात मात्र तेवढ्याच प्रमाणा-



तील पेट्रोल खरेदीसाठी तब्बल १७.६ टक्के उत्पन्न खर्च करावे लागते. ही तफावत केवळ आर्थिक नाही, तर विकासाच्या पातळीचेही प्रतीक आहे. या परिस्थितीमागे अनेक कारणे आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे पेट्रोलवरील करांचा मोठा बोजा. भारतात पेट्रोलच्या किरकोळ किमतीपैकी जवळपास निम्मा भाग केंद्र आणि राज्य सरकारांच्या करांचा असतो. पेट्रोल आणि डिझेल अद्याप वस्तू व सेवा कराच्या (ऋद्ध) कक्षेबाहेर असल्यामुळे विविध करांचे ओझे ग्राहकांवर पडते. याउलट अमेरिकेसारख्या देशांमध्ये पेट्रोलवरील कर फक्त १५ ते २० टक्क्यांच्या दरम्यान आहे. पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका यांसारख्या शेजारी देशांमध्येही हा कर भारतापेक्षा कमी आहे.

पेट्रोलच्या महागाईचा परिणाम केवळ वाहनधारकांपुरता मर्यादित राहत नाही. वाहतूक खर्च वाढल्यामुळे शेतीमाल, अन्नधान्य, बांधकाम साहित्य, औद्योगिक वस्तू आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किमती वाढतात. त्यामुळे महागाईचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसतो. विशेषतः मध्यमवर्गीय आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांच्या मासिक बजेटवर त्याचा गंभीर परिणाम होतो.

भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक देश मानला जातो. देशाची अर्थव्यवस्था वाढत असली तरी त्या वाढीचा लाभ सर्वसामान्य नागरिकांच्या क्रयशक्तीत पुरेशा प्रमाणात दिसून येत नाही. पेट्रोल परवडण्याच्या जागतिक क्रमवारीत भारताचा क्रमांक १२१वा असणे हे याचेच द्योतक आहे. आर्थिक विकासाचा खरा अर्थ नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होणे हा आहे. जर दैनंदिन गरजांसाठी आवश्यक असलेल्या इंधनासाठीच उत्पन्नाचा मोठा भाग खर्च करावा लागत असेल, तर विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. यावर उपाय म्हणून पेट्रोल-डिझेलला जीएसटीच्या कक्षेत आणण्याचा विचार पुन्हा गांभीर्याने करावा लागेल. केंद्र आणि राज्य सरकारांनी महसूल आणि जनहित यामध्ये संतुलन साधणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करणे, पर्यायी ऊर्जा स्रोतांना प्रोत्साहन देणे आणि नागरिकांचे उत्पन्न वाढविणाऱ्या धोरणांवर भर देणे ही काळाची गरज आहे.

पेट्रोलच्या किंमतीचा प्रश्न हा केवळ इंधनाचा प्रश्न नाही; तो भारतीयांच्या क्रयशक्तीचा, आर्थिक न्यायाचा आणि विकासाच्या गुणवत्तेचा प्रश्न आहे. म्हणूनच पेट्रोलच्या किमतींकडे केवळ आकड्यांच्या चष्म्यातून नव्हे, तर सामान्य नागरिकाच्या खिशातून पाहण्याची गरज आहे.

**- मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# आजच्या धावपळीच्या युगात संयम महत्त्वाचा...

आजच्या धावपळीच्या आणि ताण-तणावपूर्ण जीवनात संयम ही एक मौल्यवान कला आहे. ती आपल्याला शांतता, स्पष्टता आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता देते. संयम राखल्याने आपण आपली ऊर्जा योग्य ठिकाणी वापरू शकतो, मनःस्थिती स्थिर ठेवू शकतो आणि चांगले संबंध निर्माण करू शकतो. जीवनात संतुलन आणि संयम हीच खरी ताकद आहे.

आज आपण ज्या वेगवान आणि तणाव-पूर्ण जीवनशैलीत वावरतो, तिथे संयम म्हणजेच शांत आणि विचारपूर्वक निर्णय घेण्याची क्षमता हा एक अमूल्य गुण ठरतो. संयम ठेवला, तर तणावग्रस्त परिस्थितीतही आपण शांतीने विचार करू शकतो. यामुळे गैरसमज, भांडणं आणि मानसिक अस्वस्थता टाळता येते. क्षणिक रागात बोललेल्या शब्दांपेक्षा संयम राखल्यास संवाद अधिक सकारात्मक होतो आणि नाती टिकून राहतात. घाईघाईने घेतलेले निर्णय अनेकदा चुकतात. संयम ठेवल्यास योग्य विचार करून योग्य निर्णय घेता येतो व स्वतःवरचा ताबा वाढतो.

संयम म्हणजे आपल्या भावना, विचार, वागणूक यावर ताबा ठेवणे. जेव्हा आपण संयम बाळगतो, तेव्हा आपण तातडीने प्रतिक्रिया देत नाही, तर थोडा विचार करून शांतपणे निर्णय घेतो. त्यामुळे निर्णय अधिक विवेकपूर्ण, परिणामकारक, व स्थिर असतो. तसेच, संयमाचा सराव करत गेल्यास स्वत:वरचा आत्मनियंत्रण वाढतो, जे यशस्वी व संतुलित आयुष्यासाठी आवश्यक आहे.

आजच्या धावपळीच्या युगात वाहन चालकांसाठी संयम अत्यंत महत्त्वाचा आहे. रस्त्यावर सुरक्षितता राखण्यासाठी आणि सर्वांच्या जीविताची काळजी घेण्यासाठी विचार करावा. ट्राफिक जाम, रस्त्यावरील अडथळे व इतर वाहनांशी वागताना शांतता राखणे आवश्यक आहे. वेग मर्यादेप्रमाणे आणि नियमांचे पालन करणे, अचानक ब्रेक लावणे टाळणे. ट्राफिकमध्ये धावपळ होते तेव्हा राग न येता शांत राहणे. भांडणे टाळण्यासाठी बचाव करण्यासाठी आणि सुरक्षितता राखण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करणे. इतर रस्त्यावरील लोकांबद्दल आदर आणि सहकार्य दाखवणे. संयम राखल्यानेच रस्त्यावर सुरक्षितता आणि सुखद प्रवास शक्य होतो.

रस्त्यावर इतर वाहनधारकांची काळजी घेणे, रस्त्यावरून सुरक्षितपणे जाणे आणि इतरांची अपेक्षा समजणे आवश्यक आहे. ट्रॅफिक जाम किंवा तांत्रिक अडचणी असल्यास धैर्याने थांबणे व अनावश्यक राग न येणे. वाहनचालकांनी आपली जबाबदारी जपावी आणि रस्त्यावर सुरक्षितता व आदराने वागावे. संयम हीच रस्त्यावर सुरक्षिततेची गुरुकिल्ली आहे, जी आपल्याला व इतरांना सुरक्षित ठेवते.

वाहन चालवत असताना पायी चालणाऱ्यांचा विचार करावा. यामुळे रस्त्यांवर सुरक्षितता वाढते आणि अपघात टाळता येतात. आवश्यक वाटल्यास हॉर्न वाजवा किंवा इशारा द्या, जेणेकरून पायी चालकांना तुमची गाडी दिसेल. रस्त्याच्या वेगाच्या मर्यादेपेक्षा जास्त वेगाने न चालणे, कारण त्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. वर्दळ असलेल्या भागांमध्ये विशेष लक्ष द्या. यामुळे रस्त्यावर सर्वांची सुरक्षितता सुनिश्चित होते. वाहन चालवताना ही बाब लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड
मो. ९६८९११७१६९

# नरसी चौकातील अतिक्रमण धारकांना ७ दिवसांचा अल्टिमेटम

## रामतीर्थ पोलिसांनी नोटीस बजावल्या; अतिक्रमणधारकांवर कारवाई अटळ

**नायगांव बाजार (प्रतिनिधी)–** शिरूर ताजबंद - मुखेड - नरसी - बिलोली - येसगी पूल या राज्य महामार्ग क्रमांक २२५ वरील रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिक्रमणांवर सार्वजनिक बांधकाम विभागाने अखेर कठोर भूमिका घेतली असून अतिक्रमण धारकांना सात दिवसांच्या आत जागा रिकामी करण्याचा अंतिम इशारा देण्यात आला आहे. अन्यथा संबंधित विभागाकडून थेट अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात येणार असून झालेल्या नुकसानीस संबंधित अतिक्रमण धारकच जबाबदार राहतील, असा स्पष्ट इशारा नोटिशीत देण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुखेडचे उपविभागीय अभियंता यांनी जारी केलेल्या आदेशानुसार राज्य महामार्ग क्रमांक २२५ च्या दोन्ही बाजूस व्यापारी, व्यावसायिक तसेच इतर नागरिकांनी केलेली अतिक्रमणे सां.बा. विभागाच्या निदर्शनास आली आहेत. रस्त्याच्या मध्यबिंदूपासून दोन्ही बाजूस १५ मीटर (५० फूट) अंतरापर्यंतची जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची असून नाल्याच्या पलिकडील क्षेत्र देखील विभागाच्या हद्दीत येते. त्यामुळे या क्षेत्रातील सर्व अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे तातडीने हटविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याशिवाय नगरविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार महामार्गाच्या मध्यरेषेपासून २० मीटर (६५ फूट) अंतरापर्यंत कोणतेही नवीन बांधकाम करण्यास मनाई असल्याचेही नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम ९ नुसार विभागाची लेखी परवानगी घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम करता येत नसल्याने परवानगीशिवाय उभारलेली सर्व बांधकामे बेकायदेशीर समजली जाणार आहेत.

विशेष म्हणजे, या नोटीस रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांच्या माध्यमातून नरसी मुख्य चौकातील संबंधित अतिक्रमण धारकांना बजावण्यात आल्या आहेत. सात दिवसांच्या मुदतीत अतिक्रमण हटविण्यात अपयश आल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रशासनाच्या संयुक्त पथकाकडून थेट कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनी विक्रम हराळे यांनी दिली आहे.

दरम्यान, रस्त्यावरील वाढती अतिक्रमणे, अनधिकृत दुकाने, शेड्स आणि इतर बांधकामांमुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत असल्याच्या तक्रारी वारंवार होत होत्या. त्यामुळे प्रशासनाने आता अतिक्रमणमुक्ती मोहिमेसाठी कंबर कसल्याचे दिसून येत आहे. येत्या काही दिवसांत नरसी, मुखेड, बिलोली व परिसरातील महामार्गालगतच्या अतिक्रमणांवर बुलडोझर चालण्याची शक्यता असल्याने अतिक्रमण धारकांमध्ये खळबळ उडाली आहे.

# दमदाटी करून विनापरवाना हॉटेलच्या दारापुढे महावितरणचे रोहित्र

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या केळी मार्केट भागात असलेल्या एका हॉटेलसमोर विनापरवाना महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी डीपी बसविल्याने या परिसरात येणाऱ्या- जाणाऱ्या ग्राहकांना त्रास सहन करावा लागणार आहे. भविष्यात एखादी अनुचित घटनाही घडण्याची शक्यता हॉटेल मालक यांनी व्यक्त केली आहे.

मोहन मगनलाल लालवाणी, रा. जुना मोंढा, नांदेड येथे गेल्या ४० वर्षापासून हॉटेल कुंदन या नावाने केळी मार्केट मध्ये त्यांचा स्वतःचा व्यवसाय चालवतात.

काही असामाजीक घटक जाणुनबुजुन त्रास व्हावा या दृष्टीने आमच्या हॉटेल समोर महावितरणचे रोहित्र लावण्यासाठी बळजबरी व दमदाटी करत आहेत.

माझा व्यवसाय दारुचा असून माझ्याकडे अधिकृतरित्या शासनाने दिलेला परवाना आहे. हॉटेलमध्ये दररोज जवळपास २०० ग्राहकांची आवक-जावक असते तसेच शेजारी शिंदी डेपो आहे. तिथेही दिवसभरात हजारो ग्राहक येतात.अशा वर्दळीच्या ठिकाणी बहुतांश जण दारु व शिंदीच्या नशेत असतात. तिथे उघड्या रोहित्राच्या बॉक्सला चिटकुन अपघात होण्याची दाट शक्यता आहे. तरी सदरचे रोहित्र इतरत्र बसवावा, अशी मागणी मोहन लालवाणी यांनी महावितरणकडे केली आहे.

# गोपाळचावडी ग्रामपंचायतच्या ग्रामसभेत वार्ड आरक्षण घोषित

## एकूण वार्ड ४, ११ जागांपैकी ६ महिलांसाठी तर ५ पुरूषांसाठी आरक्षित

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील गोपाळ-चावडी ग्रामपंचायत निवडणूक वार्ड आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार ४०६८ एकूण लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतमध्ये ४ वार्डात ११ सदस्य संख्या आहे. यात ६ वार्ड महिलांसाठी तर ५ वार्ड पुरुषांसाठी आरक्षित करण्यात आले आहेत. थेट जनतेतून एसटी महिलेसाठी सरपंचपद आरक्षित झाले असल्याने ग्रामपंचायतीवर ७ महिलांचे वर्चस्व राहणार आहे.

आगामी काळात होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीसाठी गोपाळ-चावडी येथे वार्डनिहाय आरक्षण जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी संतोष आकुसकर व तलाठी योगीता अनमवार, ग्रामसेवक वर्षा पाटील यांच्या उपस्थितीत ग्रामसभा घेण्यात आली.



यावेळी माजी सरपंच सुरेखा प्रदीप लाखे, माजी उप-सरपंच साहेबराव सेलूकर, रमेश तालीमकर, प्रल्हाद काब्दे, माजी पोलीस पाटील संजय शिंदे, सदस्य प्रतिनिधी अनिल धमणे पाटील, पंडित गजभारे, पोलीस पाटील छाया विजय खटके यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वार्ड क्रं १ एससी सर्वसाधारण, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण पुरूष ३ जागा, वार्ड २ एसटी महिला, सर्वसाधारण, २ जागा, वार्ड क्रं. ३ एस.सी. महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण पुरूष, ३ जागा, वार्ड क्रं. ४ एससी महिला, ओबीसी महिला, सर्वसाधारण महिला, ३ जागा अशा ११ जागेसाठी वार्डनिहाय आरक्षण जाहीर झाले आहे.

घोषित झालेल्या या वार्ड आरक्षण संदर्भात १७ जून रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे तलाठी अन्नमवार यांच्या उपस्थितीत हरकती स्वीकारण्यात येणार आहेत. यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार मारोती माने, बापुराव जाधव यांनी पोलीस बंदोबस्त ठेवला होता.



**नांदेड :** भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नगरसेवक आशुतोष जोशी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, महेश कनकदंडे, दिलीप कंदकुर्ते, महेश खोमणे, गणेशलाल जोशी, निलेश कुंटूरकर, निलेश कासलीवाल, वसंत पाटील, ओम रूईकर, साई कळसकर, प्रेम वीर, सौरभ देशमुख, प्रियेश ठाकूर आदींची यावेळी उपस्थिती होती.

# प्राचार्य हेमंत इंगळे यांना पीएच. डी. पदवी प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी) –**श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड येथील प्राचार्य हेमंत इंगळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विज्ञान शाखेतील इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी प्रदान करण्यात आली.



प्राचार्य हेमंत इंगळे यांनी इतिहास विषयातील 'डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या प्राचीन भारताच्या इतिहासलेखनाचे विश्लेषणात्मक अध्ययन' या विषयावर शोधप्रबंध सादर केला होता. त्यांची अंतिम मौखिक परीक्षा नुकतीच पार पडली. यावेळी मानव्य विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग खडके, बाह्य परीक्षक डॉ. विष्णू वाघमारे (श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, जि. सोलापूर), संशोधन मार्गदर्शक डॉ. राहुल वरवंटीकर, तसेच डॉ. संजय झुंबाडे, प्रा. कैलास खानसोळे आणि प्रकाश फाजगे यांच्या उपस्थितीत त्यांना इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी प्रदान करण्यात आली.

# आमदार बोंढारकर यांची माणुसकी; रुग्णालयाचे सव्वा लाखांचे बील भरून दिला मदतीचा हात

**नांदेड (प्रतिनिधी) –**राजकारणात अनेकदा आश्वासनांची चर्चा होते; मात्र प्रत्यक्ष कृतीतून माणुसकी जपणारे नेते विरळाच असतात. नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर यांनी शेतकरी नेते प्रल्हाद इंगोले यांना कठीण प्रसंगी केलेल्या मदतीमुळे त्यांच्याविषयी सर्वत्र कौतुक व्यक्त होत आहे.

गेल्या काही महिन्यांत प्रल्हाद इंगोले या कार्यकर्त्यावर संकटांचा डोंगर कोसळला होता. एका अपघातात पायाला गंभीर दुखापत होऊन अनेक फ्रॅक्चर झाले. त्यातून सावरत असतानाच १ जून रोजी त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला. हृदयाला रक्तपुरवठा करणारी वाहिनी ९५ टक्क्यांहून अधिक ब्लॉक झाल्याने तातडीने अँजिओप्लास्टी करावी लागली. उपचारासाठी मोठा खर्च झाल्याने कुटुंब आर्थिक अडचणीत सापडले होते.

दरम्यान, उपचार सुरू असताना अनेक मित्र, नातेवाईक आणि नेत्यांनी भेट देऊन विचारपूस केली. मात्र रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर काही दिवसांनी संबंधित कार्यकर्त्याला एक सुखद धक्का बसला. रुग्णालयाचे एक लाख रुपयांहून अधिक बाकी असलेले बील आमदार आनंदराव बोंढारकर यांनी स्वतः पुढाकार घेऊन भरल्याचे त्यांना समजले.

विशेष म्हणजे, आमदार बोंढारकर यांनी याबाबत कोणतीही प्रसिद्धी न करता, सोशल मीडियावर पोस्ट न टाकता किंवा कुठलाही गाजावाजा न करता ही मदत केली. रुग्णालयात भेट दिल्यानंतर त्यांनी डॉक्टरांशी चर्चा करून संबंधित रुग्णाच्या उपचारांची माहिती घेतली आणि सुमारे सव्वा लाख रुपयांचे बील रोख स्वरूपात अदा केले. आमदारांची ही कृती पाहून डॉक्टरही अचंबित झाल्याचे सांगितले जात आहे.

संबंधित कार्यकर्त्याने आमदार बोंढारकर यांचे आभार व्यक्त करत ही मदत मी मनापासून स्वीकारत असून, योग्य वेळी ही रक्कम त्यांना सन्मानाने परत करणार आहे. त्यामुळे आणखी एखाद्या गरजू व्यक्तीला मदत करता येईल, अशी भावना व्यक्त केली.

राजकीय क्षेत्रात निस्वार्थी मदतीची उदाहरणे कमी होत असताना, आमदार आनंदराव बोंढारकर यांच्या या कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून त्यांच्या माणुसकीची सर्वत्र चर्चा होत आहे. चांगल्या कामांची चर्चा झाली पाहिजे, त्यातून समाजात चांगले काही करण्याची प्रेरणा मिळते, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# बाभुळगाव येथे ग्रामसभेत ग्रामपंचायत वार्ड आरक्षण घोषित

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील बाभुळगाव ग्रामपंचायत साठी आगामी ग्रामपंचायत निवडणूक संदर्भाने २०११जनगणनेच्या नुसार २८७० एकुण लोकसंख्या असुन सदस्य संख्या ९ असुन वार्ड ३ आहेत,यात महिला ५ व पुरुष ४ असुन यात एस.सी १,ओबीसी २, उर्वरित सहा जागा सर्वसाधारण साठी आरक्षित झाली आहे.एकुण जागा ५ महिला जागा चार पुरूषसाठी आरक्षित झाल्या आहेत, आगामी थैट जनतेतून एससी महिला सरपंच पदासाठी आरक्षित झाली असल्याने ग्रामपंचायत वर सहा महिलाचे वर्चस्व राहणार आहे.

आगामी होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणूक साठी वार्ड निहाय आरक्षण जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी संतोष आकुसकर व तलाठी योगीता अनमवार, ग्रामसेवक राजु कदम यांच्या उपस्थितीत ग्रामसभा घेण्यात आली. यावेळी माजी सरपंच पुंडलिक मस्के, माजी सरपंच दता मोरे,मधुकर मस्के ,दता बोडके, बालाजी पाटील मस्के, रवि लांडगे, मधुकर मस्के,मूंजाजी मोरे, दत्तात्रेय मोरे,पोलीस पाटील संतोष मोरे यांच्या सह ग्रामपंचायत सदस्य व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरक्षण मध्ये वार्ड क्रं १ ओबीसी महिला, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण पुरूष, तिनं जागा,वार्ड २ ओबीसी महिला, सर्वसाधारण दोन पुरूष, तिनं जागा,वार्ड क्रं ३ एस.सी.महिला ,ओपन महिला व ओपन पुरूष , तीन जागा असेआरक्षीत झाले

# ममता विविधकर यांच्या वारसदारांचा शोध; १५ दिवसांत संपर्क न केल्यास नोकरीचा दावा संपुष्टात

**नांदेड (प्रतिनिधी)–** किनवट तालुक्यातील मारेगाव खालचे येथील ममता रेखा विविधकर यांच्या खूनप्रकरणी त्यांच्या पात्र वारसदारांना शासनाच्या विशेष योजनेअंतर्गत शासकीय अथवा निमशासकीय नोकरी मिळण्याची संधी उपलब्ध असून, संबंधित वारसदारांचा शोध घेण्यासाठी समाज कल्याण विभागाने आवाहन केले आहे.

ममता रेखा विविधकर यांच्या खुनाची नोंद किनवट पोलीस ठाण्यात गु.र.न. १३७/२०२४, दि. २८ मे २०२४ रोजी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र. २१४, दि. २० नोव्हेंबर २०२५ नुसार अशा प्रकरणांमध्ये मृत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्र वारसास शासकीय अथवा निमशासकीय नोकरी देण्याची तरतूद आहे.

या अनुषंगाने समाज कल्याण विभागाने मयत महिलेच्या वारसदारांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. विभागातील कर्मचाऱ्यांनी मारेगाव खालचे येथे प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी केली असता, वारसदार राज्याबाहेर वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. मात्र ते नेमके कुठे आणि कोणत्या राज्यात राहतात, याबाबत गावातील सरपंच, पोलीस पाटील व नागरिकांकडे कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती.

समाज कल्याण विभागाने मयत महिलेचे वारसदार, रक्ताचे नातेवाईक किंवा त्यांचा संपर्क असलेल्या व्यक्तींनी आवश्यक नातेसंबंधाची कागदपत्रे घेऊन पुढील १५ दिवसांच्या आत संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय योग ऑलिम्पियाड २०२६ मध्ये इयत्ता तिसरी ते बारावीमधील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभागी होण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी) –** आयुष मंत्रालय, भारत सरकारच्यावतीने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगा दिन म्हणून आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन २०१४ च्या राष्ट्रीय महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगादिन म्हणून दरवर्षी साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने दरवर्षी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगा दिन म्हणून जगभरात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.

योगा दिनाच्या निमित्ताने जगभरात योगासनाची परंपरा स्वीकारणे व ती अंगिकारणे, ही आपल्या देशासाठी अभिमानाची बाब आहे. कारण योगा हा आपल्या भारतीय संस्कृती वारसाचा अविभाज्य घटक आहे.

आयुष मंत्रालय, भारत सरकार, महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड, योग विद्याधाम, पतंजली योग समिती, जिल्हा योग संघटना नांदेड, योग विद्येचा प्रसार करणाऱ्या स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी व विविध खेळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

तसेच NCERT आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने २०१६ पासून राष्ट्रीय योग ऑलिम्पियाडचे आयोजन सुरू केले आहे. संयुक्त राष्ट्र महासभेने २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. या संदर्भात १० जून, २०२६ पर्यंत इयत्ता तिसरी ते इयत्ता बारावी-मधील विद्यार्थ्यांना ऑनलाईन रजिस्ट्रेशन करून सहभाग घेता येणार आहे.

नांदेड जिल्ह्यातून अधिकाधिक सहभाग होण्यासाठी प्राचार्य, डायट, सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक /माध्यमिक) गटशिक्षणाधिकारी सर्व पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, विविध क्रीडा संघटनेचे पदाधिकारी, विविध योग संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू, प्रशिक्षक व नागरीक यांनी सदर मेसेज आपल्या जिल्ह्यातील, तालुक्यातील व केंद्रातील ग्रुपवर पाठवून विद्यार्थ्यांना पुढील लिंकवर नोंदणी करून सहभाग होण्यासाठी आवाहन करावे असे कळविले आहे.

# अर्धवेळ परिचारिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करू; जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे आश्वासन

**नांदेड(प्रतिनिधी)–** येथील जिल्हा परिषदेंतर्गत जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात काम करणाऱ्या अर्धवेळ स्त्री परिचारिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी सूर्यवंशी यांनी आयटक प्रणीत महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते अंशकालीन स्त्री परिचर संघटनेच्या शिष्टमंडळाशी बोलताना दिले.

नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत विविध प्राथमिक आरोग्य केंद्रात काम करणाऱ्या अर्धवेळ स्त्री परिचारिकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आयटक प्रणीत महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते अंशकालीन स्त्री परिचर संघाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. या दरम्यान एका शिष्टमंडळाने प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी सूर्यवंशी यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी थकीत वेतन, गणवेश व ओळखपत्रासाठी तातडीने कारवाई केली जाईल. गणवेशामध्ये दिल्या जाणाऱ्या साड्यांसाठी जि.प.च्या सेस निधीतून पैसा उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याचप्रमाणे शासन नियमाप्रमाणे ६ हजार रुपये वेतन दरमहा करण्यात येईल. परिचारिकांना दरवर्षी ऐवजी एकदाच नियुक्ती पत्र देण्यासंदर्भात तातडीने कारवाई करण्यात येईल. राज्यस्तरावरील प्रश्नांसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचे आश्वासन सूर्यवंशी यांनी यावेळी दिले. या चर्चेत महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते अंशकालीन स्त्री परिचर संघटनेचे नेते अॅड. कॉ. प्रदीप नागापूरकर, भाकपचे जिल्हा सचिव कॉ. शिवाजी फुलवळे, कॉ. अब्दुल गफार, कॉ. देवराव नारे, कॉ. वर्षा भाकरे, कॉ. महामाया पाटील, कॉ. अनिता जाधव, कॉ. मंजुषा मळगदे, कॉ. सलिमाबी मस्तान, कॉ. लक्ष्मीबाई कापसे, कॉ. मुन्नाबी हुसेन, कॉ. यमुनाबाई डुकरे, कॉ. माधाबाई रुदरगे यांच्यासह स्त्री परिचारिका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# अमरनाथ यात्रेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून २४ जून रोजी २७ व्या चालण्याच्या स्पर्धेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सुदृढ, निरोगी आणि तंदुरुस्त भारत घडविण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने बुधवार, दि. २४ जून रोजी सकाळी ६ वाजता श्रीराम सेतू, गोवर्धनघाट, नांदेड येथे २७ व्या चालण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत माध्यम प्रतिनिधींसह विविध अकरा गटांतील विजेत्यांना स्नेहलता जायस्वाल यांच्यातर्फे आकर्षक मोबाईल बक्षीस देण्यात येणार असून, वेळेवर उपस्थित राहणाऱ्या पहिल्या २०० स्पर्धकांना आकर्षक टी-शर्ट देण्यात येणार असल्याची माहिती संयोजक धर्मभूषण अॅड. दिलीप ठाकूर यांनी दिली.

भाजपा महानगर नांदेड, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल आणि अमरनाथ यात्री संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा गेल्या अनेक वर्षांपासून नांदेडकरांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे लोकप्रिय आणि प्रेरणादायी उपक्रम बनली आहे. आरोग्य संवर्धन, नियमित व्यायामाची सवय आणि सामाजिक एकोपा वाढविण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.

या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास खासदार डॉ. अजित गोपछडे, भाजपा महानगराध्यक्ष तथा आ. अमरनाथ राजूरकर, आ. श्रीजया चव्हाण, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, अॅड. चैतन्य देशमुख, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, अॅड. किशोर देशमुख, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंह गाडीवाले, सभागृह नेते अॅड. महेश कनकदंडे, जिल्हा सरचिटणीस विजय येवनकर, शीतल खांडील, विजय गंभीरे, सुषमा थोरात तसेच लायन्स उपप्रांतपाल योगेश जायस्वाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

अमरनाथ यात्रेच्या पूर्वतयारीचा हा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. यंदाची २७ वी अमरनाथ यात्रा दि. ३ जुलै रोजी तर २८ वी अमरनाथ यात्रा दि. १७ जुलै रोजी नांदेड येथून रवाना होणार आहे. समुद्रसपाटीपासून मोठ्या उंचीवर आणि अत्यंत प्रतिकूल हवामानात होणारी अमरनाथ यात्रा शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक मानली जाते. त्यामुळे यात्रेकरूंना तीन महिने आधीपासून नियमित चालणे, ओपन जीममधील व्यायाम, प्राणायाम, हास्ययोग आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन दिले जाते.

नांदेडकरांनी या आरोग्यदायी आणि प्रेरणादायी उपक्रमात सहभागी होऊन निरोगी जीवनशैलीचा संकल्प करावा, असे आवाहन भाजपा जिल्हा सरचिटणीस तथा अमरनाथ यात्री संघाचे अध्यक्ष अॅड. दिलीप ठाकूर यांनी केले आहे.

# वीज कंपनीचे सहायक अभियंता राधेश्याम जाधव यांना निरोप



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** येथील वीज वितरण कंपनीचे सहायक अभियंता राधेश्याम जाधव यांची कल्याण येथे बदली झाली. त्यामुळे वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात कार्यक्रम घेऊन मान्यवरांच्या उपस्थितीत एका छोटेखानी कार्यक्रम घेऊन निरोप देण्यात आला.

या कार्यक्रमास नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, उपविभागीय अभियंता पंकज देशमुख, व्हाईस ऑफ मीडियाचे अध्यक्ष गोविंद टेकाळे, मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सखाराम क्षीरसागर, मनसब खान, जिल्हाध्यक्ष सय्यद युनूस, माजी सरपंच शंकर टेकाळे, राजू टेकाळे, राष्ट्रवादीचे शेख साबेर, अझर काजी, नामदेव सरोदे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी राधेश्याम जाधव यांचा सत्कार करण्यात आला. तसेच वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने भेटवस्तू देण्यात आली.

यावेळी सय्यद मोहसीन, श्रीनिवास कुलकर्णी, गोविंद चोपडे, गजानन सुवर्णकार, गोविंद इंगोले, डी. बी. इंगोले, लक्ष्मण पुरी, संतोष वाघमारे, वडजे प्रवीण, राजेश डोईजड, गणेश जोगदंड, सुभानी पठाण, व्ही.जी. जाधव, ए. ए. पठाण, सय्यद मुख्खीद, शिवा कदम, प्रभू कदम, रवी लोणे, हिमायत बेग यांच्यासह वीज वितरण कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# सुटकेस भरण्याची सर्वोत्तम पद्धत... जागा वाचते, कपड्यांना पडत नाही घडी

**कुठे फिरायला जाणे जितके रोमांचक असते, तितकेच पॅकिंग करणे कंटाळवाणे असू शकते. कमी जागेत जास्त सामान कसे बसवायचे आणि कपड्यांना चुरगळण्यापासून कसे वाचवायचे, या द्विधा मनस्थितीमुळे पॅकिंग करणे अत्यंत कठीण होऊन जाते. पॅकिंग करताना तुम्ही अशा द्विधा मनस्थितीत असाल, तर काही सोप्या पॅकिंग हॅक्सच्या मदतीने तुम्ही तुमच्या सुटकेसची जागा दुप्पट करू शकता. यामुळे तुमचे कपडे चुरगळण्यापासून वाचतील आणि तुम्हाला कमी जागेत जास्त सामान बसवता येईल...**



» रोल करा : बहुतेक लोक त्यांचे कपडे सुटकेसमध्ये घडी करून ठेवतात. यामुळे कपड्यांना सुरकुत्या पडतात आणि जागा व्यापली जाते. कपडे गुंडाळल्याने त्यांना सुरकुत्या पडत नाहीत आणि ते कमी जागेत बसतात. टी-शर्ट, जीन्स, पायजमा, कुर्ता इत्यादी कपडे सहजपणे गुंडाळून सुटकेसमध्ये ठेवता येतात.

» फॉर्मल कपड्यांसाठी बंडल रॅपिंग : जर तुम्ही एखाद्या फॉर्मल इव्हेंटला जाण्यासाठी प्रवास करत असाल आणि कोट, पँट, रेशमी साड्या किंवा महागडे गाऊन घेऊन जात असाल, तर त्यांना बंडल रॅप करा. जीन्स किंवा जॅकेट सुटकेसच्या तळाशी अर्धे आत आणि अर्धे बाहेर पसरवा. फॉर्मल कपडे मध्ये ठेवा आणि नंतर जड कपड्याचा बाहेरील भाग त्यांच्यावर गुंडाळा. यामुळे तुमच्या कपड्यांना सुरकुत्या पडणार नाहीत.

» टिश्यू पेपरचा वापर करा : रेशमी किंवा शिफॉनच्या कपड्यांना घडी घालताना प्रत्येक घडीमध्ये टिश्यू पेपरचा एक तुकडा ठेवा. यामुळे कपडे एकमेकांवर घासले जाणार नाहीत आणि त्यांच्या घड्या तशाच राहतील.

» पॅकिंग क्यूब्स वापरून पहा : पॅकिंग क्यूब्स हे झिपर्स असलेले लहान कापडी डबे असतात. हे क्यूब्स वेगवेगळ्या प्रकारचे कपडे ठेवण्यासाठी वापरले जाऊ शकतात. यामुळे सुटकेसच्या वारंवार होणाऱ्या हालचालींमुळे कपडे जागेवरून सरकणार नाहीत आणि त्यांच्या घड्या खराब होणार नाहीत.

» जागेचा वापर करा : तुमच्या सुटकेसमध्ये जागा वाचवण्यासाठी, कपडे आणि इतर वस्तूंमधील जागेचा वापर करा. तुमचे मोजे, रुमाल किंवा लहान गॅझेट्स तुमच्या बुटांमध्ये ठेवा. तुमचे बूट नेहमी प्लास्टिकच्या पिशवीत गुंडाळा आणि सुटकेसच्या कडेला ठेवा.

» जड वस्तू आधी ठेवा : सुटकेस पॅक करताना, जड वस्तू आधी चाकांच्या बाजूला ठेवा, त्यानंतर गुंडाळलेले कपडे आणि इतर हलक्या वस्तू ठेवा. यामुळे बॅगेचा तोल सांभाळला जाईल आणि जड वस्तूंखाली कपडे दबणार नाहीत.

# लिप ऑइलचे फायदे किती?

**लिप ग्लॉसप्रमाणेच लिप ऑइल ओठांना चमकदार लुक देते, पण ते तितके चिकट किंवा घट्ट नसते. आपले ओठ सुंदर दिसण्यासाठी आपण लिप ग्लॉसपासून लिप बामपर्यंत अनेक उत्पादने वापरतो, पण लिप ऑइल देखील त्यांची देखभाल करण्यास मदत करते. आपण लिप ग्लॉस आणि लिप ऑइलमधील फरक जाणून घेऊ...**



लिप ग्लॉस अधिक घट्ट असतो. तो रंगीतही असतो आणि लिपस्टिकसारखा परिणाम देतो. लिप ऑइल पातळ असते. ते अधिक पारदर्शक दिसते आणि रंग देत नाही. या दोन्हींव्यतिरिक्त लिप बामचाही मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. लिप बाम या दोन्हींपेक्षा अधिक घट्ट असतो. तो ओठांवर एक थर तयार करतो. तो चमकदार लुक देत नाही आणि सहसा त्यात रंग नसतो.

## लिप ऑइल अधिक फायदेशीर का?

लिप ऑइल ओठांना अधिक खोलवर आर्द्रता देते, नैसर्गिक चमक आणते आणि खराब झालेले ओठ दुरुस्त करते. रोजच्या वापरामुळे ओठांचे पोषणही होते. लिप ऑइल लावल्यानंतर अनेक तासांनंतरही ओठ ओलसर ठेवते. त्याचा हलका आणि न चिकटणारा फॉर्म्युला लिपस्टिकसोबत वापरण्यास सोपा बनवतो.

## लिप ऑइल कधी लावावे?

» सकाळची दिनचर्या : दिवसभर तुमचे ओठ ओलसर ठेवण्यासाठी तुमच्या सकाळच्या स्किनकेअर रूटीनमध्ये याचा समावेश करा.

» प्रायमर म्हणून : लिपस्टिकचा रंग अधिक चांगला येण्यासाठी तुम्ही याचा प्रायमर म्हणून वापर करू शकता.

» रात्रीचा वापर : झोपण्यापूर्वी लिप ऑइलचा जाड थर लावल्याने तुमचे ओठ खोलवर ओलसर होतात आणि त्यांची दुरुस्ती होते.

» दिवसभर : दिवसा कोणत्याही वेळी तुमचे ओठ कोरडे वाटल्यास, तुम्ही ते पुन्हा लावू शकता.

**जर तुम्ही नैसर्गिक आणि प्रभावी लिप ऑइलच्या शोधात असाल, तर जोजोबा तेल, बदामाचे तेल किंवा चेरी तेलासारखे घटक फायदेशीर ठरू शकतात.**

# साडीवर ब्लाउज घालण्याची नव्हती परंपरा, तरी कसे बनले आपल्या संस्कृतीचा भाग!

**साडी हा एक असा पोशाख आहे जो आपल्या संस्कृतीत खोलवर रुजलेला असून स्त्रीचे सौंदर्य वाढवतो. आजकाल साडीसोबत ब्लाउजचे अनेक डिझाइन्स ट्रेंडमध्ये आहेत, पण तुम्हाला कधी प्रश्न पडला आहे का की स्वीटहार्ट, हॉल्टर, बोट नेक किंवा बॅकलेस यांसारख्या डिझाइन्सचा उगम कुठून झाला?**

आज आपण साडीसोबत जे ब्लाउज घालतो, किंवा ज्या प्रकारच्या साड्या नेसतो, त्या कधीही आपल्या संस्कृतीचा भाग नव्हत्या. होय, तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की काही शतकांपूर्वी भारतात साडीसोबत ब्लाउज घालण्याची प्रथा नव्हती. प्राचीन भारतात स्त्रिया साडी नेसून आपला साडीनेच पूर्ण अंग झाकायच्या. ही एक सामान्य गोष्ट होती. मग प्रश्न असा निर्माण होतो की: ब्लाउज आला कुठून? चला याबद्दल अधिक जाणून घेऊया...



## ज्ञानदानंदिनी देवी कोण होत्या?

आज आपण साडीसोबत जो ब्लाउज घालतो आणि ज्या पद्धतीने साड्या नेसतो, त्याचे संपूर्ण श्रेय ज्ञानदानंदिनी देवींना जाते. त्या एक सामान्य स्त्री नव्हत्या. त्या महान कवी रवींद्रनाथ टागोर यांचे मोठे बंधू सत्येंद्रनाथ टागोर यांच्या पत्नी होत्या. १९ व्या शतकातील बंगालमध्ये स्त्रियांवर अनेक कठोर नियम लादले गेले होते. 'पडदा पद्धती'नुसार, स्त्रियांना घराच्या चार भिंतींमध्ये बंदिस्त राहावे लागत असे. त्यांचे पती सत्येंद्रनाथ हे खूप उदारमतवादी आणि स्त्री हक्कांचे समर्थक असले तरी कुटुंबाच्या कठोर नियमांमुळे ज्ञानदानंदिनींना मोकळा श्वास घेणेही खूप कठीण झाले होते.

## हा बदल कसा सुरू झाला?

जेव्हा ज्ञानदानंदिनी आपल्या पतीसोबत वेगळ्या घरात राहायला गेल्या, तेव्हा बदलाची सुरुवात झाली. पुढे जेव्हा सत्येंद्रनाथ यांची बॉम्बे (आताचे मुंबई) येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झाली, तेव्हा ज्ञानदानंदिनी एका नव्या जगात दाखल झाल्या. येथे त्यांना उच्चभ्रू लोकांशी आणि ब्रिटिश समाजाशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

## एका घटनेने साडीचा इतिहास बदलला...

मुंबईत राहत असताना ज्ञानदानंदिनी देवी एकदा ब्रिटिश राजवटीतील एका उच्चभ्रू क्लबला भेट देण्यासाठी गेल्या होत्या, तेव्हा त्यांना दारातच थांबवण्यात आले. याचे कारण त्यांचा पेहराव होता. साडी नेसण्याची पारंपरिक बंगाली पद्धत, ज्यात शरीराचा वरचा भाग झाकण्यासाठी ब्लाउज किंवा शर्टचा समावेश नसायचा, ती ब्रिटिशांच्या मते 'असंस्कृत' होती. या घटनेने ज्ञानदानंदिनी देवींना आतून हादरवून सोडले आणि त्यांनी आपली साडी नेसण्याची पद्धत बदलण्याचा निश्चय केला, जेणेकरून त्या आपली भारतीय ओळख न गमावता सन्मानाने आधुनिक जगात वावरू शकतील.

## पारशी गारा आणि आधुनिक ब्लाउजचा जन्म



ही इच्छा पूर्ण करण्यासाठी ज्ञानदानंदिनी यांनी मुंबईतील पारशी महिलांकडून प्रेरणा घेतली. आतमध्ये पेटीकोट घालून पारशी पद्धतीने साडी नेसायला सुरुवात केली. वरचा भाग शालीनपणे झाकण्यासाठी त्यांनी इंग्लिश शर्ट्सपासून प्रेरित होऊन कॉलर असलेला ब्लाउज तयार करून घेतला. त्यांनी साडीच्या पुढच्या भागात चुण्या घातल्या आणि पदर डाव्या खांद्यावर घ्यायला सुरुवात केली, ज्यामुळे पदर खाली करून साडी नेसण्याची प्रथा सुरू झाली.

## अशा प्रकारे आधुनिक साडीचा जन्म...

जेव्हा त्या कोलकाताला परतल्या, तेव्हा इतर महिलांना ही नवीन 'निवी ड्रेप' शैली शिकवण्यासाठी वर्ग आयोजित केले, जिथे शेकडो महिला साडीची ही नवीन आधुनिक आवृत्ती शिकायला आल्या. सुरुवातीला लोकांनी याला 'अश्लील' आणि 'परंपरेच्या विरुद्ध' म्हटले, पण ज्ञानदानंदिनी मागे हटल्या नाहीत. ज्ञानदानंदिनी देवी, ज्यांनी एके काळी फक्त बंगालमधील स्त्रियांना साडी नेसण्याची एक नवीन पद्धत शिकवली होती, त्यांनी कधी कल्पनाही केली नसेल की ही पद्धत संपूर्ण भारतातील महिलांची 'ओळख शैली' बनेल.



# माहेर बनते गेस्टहाऊस...

## ज्या घरात मुलींनी बालपण घालवले, ते घर लग्नानंतर का बनते परके?

**आपल्या देशात मुलींना लहानपणापासूनच दुसऱ्यांची मालमत्ता मानले जाते. लग्नानंतर मुलीचे मूळ घर तिच्या पतीचे होते आणि माहेर परके बनते. यामुळे हा प्रश्न निर्माण होतो: लग्नानंतर तिला माहेरला भेटण्यासाठी परवानगी का घ्यावी लागते? ज्या घरात ती लहानपणापासून वाढली, ते घर लग्नानंतर तिचे स्वतःचे का राहत नाही? या प्रश्नाचे उत्तर इतके सरळ नाही. म्हणून, यामागील सामाजिक आणि मानसिक पैलू समजून घेण्यासाठी आम्ही ज्येष्ठ मानसशास्त्रज्ञ डॉ. मोनिका शर्मा यांच्याशी संवाद साधला. चला, लग्नानंतर माहेरसोबतचे नातेसंबंध का आणि कसे कमकुवत होऊ लागतात हे समजून घेऊया...**



### परंपरा आणि नव्या जबाबदाऱ्यांचे ओझे

भारतीय समाजात मुलीने लग्नानंतर सासरी जाणे ही एक जुनी परंपरा आहे. शतकानुशतके मुलींना दुसऱ्याची मालमत्ता मानले गेले आहे आणि म्हणूनच, लग्नानंतर त्यांचे आई-वडिलांचे घर त्यांचे न राहता माहेर बनते. लग्नानंतर मुलीची ओळख सून आणि पत्नीपुरती मर्यादित राहते. सासरच्या घरात तिच्यावर नव्या जबाबदाऱ्यांचे ओझे पडते. नवीन घर सांभाळणे, सासू-सासऱ्यांची सेवा करणे, पतीची काळजी घेणे, मुलांचे संगोपन करणे आणि सासरच्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे या सर्वांच्या दबावामुळे तिची शक्ती क्षीण होते, ज्यामुळे तिला आई-वडिलांसोबतच्या नात्यांसाठी वेळ काढणे कठीण होते.

### अलिप्ततेची मानसिकता

लग्नानंतर मुलींचे सासर हे शक्यतो माहेरापासून दूर असते. काहींचे तर दुसऱ्या शहर, राज्यात असते. अशात सुरुवातीला माहेरच्यांना भेटण्याचा उत्साह असतो, पण रोजच्या धावपळीमुळे प्राधान्यक्रम बदलतात. माहेरी जाणे अशक्य होऊन जाते, फोनवरील संभाषणेही मर्यादित होतात. इतकेच नाही, तर सासरच्या मंडळींकडूनही बंधने सुरू होतात. पारंपरिक विचारसरणीमुळे पालकांचा अनेकदा असा विश्वास असतो की मुलीच्या लग्नानंतर त्यांच्या जबाबदाऱ्या संपतात. सासरच्या लोकांशी समस्या निर्माण होतील या भीतीने ते आपल्या मुलीला वारंवार फोन करणे किंवा घरी बोलावणे टाळतात. आजही हीच परिस्थिती आहे. सुशिक्षित आणि नोकरी करणाऱ्या मुली आपल्या माहेरच्या संपर्कात तर राहतात, परंतु सामाजिक दबाव, मुलांचे शिक्षण आणि नोकरी यांमुळे हे नाते केवळ भेटीगाठींपुरतेच मर्यादित राहते.

### या मानसिकतेचे तोटे काय आहेत?

मुलींना परक्या समजण्याची मानसिकता पितृसत्ता आणि लिंगभेदामध्ये रुजलेली आहे. लग्नानंतरही मुलांना कुटुंबाचा भाग मानले जाते, तर मुलींना पूर्णपणे दुसऱ्यांची मालमत्ता समजले जाते. धक्कादायक बाब म्हणजे, सासरच्या घरीसुद्धा सुनांना 'हे तुमचे स्वतःचे घर नाही' असे म्हणून हिणवले जाते. ही मानसिकता स्त्रियांच्या आत्मसन्मानाला धक्का पोहोचवते. मुली आपल्या माहेरी जाण्यास कचरू लागतात आणि गरज पडल्यास मदत मागण्यास संकोच करतात. यामुळेच अनेक स्त्रिया सासरच्या घरी होणारा छळ सहन करत राहतात, पण माहेरी जाण्यापूर्वी दोनदा विचार करतात. इतकेच नाही, तर या मानसिकतेमुळे स्त्री भ्रूणहत्या, शिक्षणातील भेदभाव आणि स्त्रियांच्या स्वातंत्र्यावरील निर्बंध यांसारख्या सामाजिक दुष्कृत्यांना जन्म मिळतो.

# केसांची निगा राखण्यासाठी कोरफड जेल वापराचे 6 मार्ग...

**कोरफड हा केसांची निगा राखणारा एक नैसर्गिक घटक आहे, जो आजीबाईंच्या घरगुती उपायांपैकी एक मानला जातो. कोरफड जेलमध्ये काही विशिष्ट पोषक तत्वे असतात जी केस मजबूत करण्यास आणि केसांच्या विविध समस्या दूर करण्यास मदत करू शकतात. तुमच्या केसांच्या निगा राखण्याच्या दिनचर्येत कोरफड जेलचा समावेश करण्याचे सहा मार्ग येथे दिले आहेत...**

» कंडिशनिंगसाठी कोरफड जेल : कोरफड जेलला नैसर्गिक कंडिशनर मानले जाते. कारण ते केसांना खोलवर आर्द्रता देते. यामुळे टाळूच्या जळजळीपासूनही आराम मिळतो. दोन मोठे चमचे कोरफडीचा गर दही किंवा खोबरेल तेलात मिसळा आणि ते ३० मिनिटांसाठी केसांना लावा. त्यानंतर, सौम्य शाम्पूने धुवा.

» कोंड्यासाठी कोरफड जेल : कोरफड जेलमधील फॅटी ॲसिड कोंडा कमी करण्यास मदत करतात आणि त्याचे दाहक-विरोधी गुणधर्म टाळूची जळजळ कमी करतात. कोंड्याचा सामना करण्यासाठी कोरफड जेलने टाळूला पूर्णपणे मालिश करा.

» केसांच्या कोरडेपणासाठी कोरफड जेल : केसांचा कोरडेपणा कमी करण्यासाठी २ चमचे जेलमध्ये गुलाबाच्या पाण्याचे ३-४ थेंब आणि व्हिटॅमिन ई कॅप्सूल मिसळा आणि लावा. ३० मिनिटांनंतर तुमच्या केसांमध्ये स्पष्ट सुधारणा पाहण्यासाठी सौम्य शॅम्पूने धुवा.

» टाळूच्या संसर्गासाठी कोरफड जेल : कोरफड जेलमध्ये बॅक्टेरिया-विरोधी गुणधर्मदेखील आहेत आणि ते टाळूच्या संसर्गाशी लढण्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकते. संसर्गावर नैसर्गिकरित्या उपचार करण्यासाठी कोरफड जेलमध्ये लिंबाच्या रसाचे ३-४ थेंब मिसळा. ते ३० मिनिटे तसेच ठेवा आणि शॅम्पू करा.

» सनस्क्रीन म्हणून कोरफडीचा गर : अति सूर्यप्रकाशामुळे केवळ चेहऱ्याचेच नव्हे, तर टाळूचेही नुकसान होऊ शकते. अशावेळी, सुखदायक गुणधर्मांनी समृद्ध असलेला कोरफडीचा गर टाळूला आराम देण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. २ चमचे गर जास्वंदीच्या फुलांच्या रसात मिसळा आणि ते टाळूला लावा. २५-३० मिनिटांनंतर केस धुवा.

» टाळूतील रक्तसंचार वाढवण्यासाठी कोरफडीचा गर : मालिश केल्याने दिवसाचा सर्व थकवा दूर होऊ शकतो. यावेळी, २ चमचे कोरफडीचा गर तुमच्या केसांच्या तेलात मिसळा. त्यानंतर, १५-२० मिनिटे हलक्या ते मध्यम दाबाने तुमच्या टाळूची मालिश करा.



# निवडणूक आयोग व भाजपा सरकार विरोधात काँग्रेसचे दादरमध्ये आंदोलन

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यसभा निवडणुकीत मध्य प्रदेशात काँग्रेस पक्षाच्या उमेवार मिनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज बेकायदेशीर व मनमानीपणे रद्द करण्याचे तीव्र पडसाद देशभर उमटले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात आज दादरमध्ये निवडणूक आयोग व भाजपा सरकार विरोधात तीव्र आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार, मोदी सरकार, फडणवीस सरकार विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. 'जब जब सरकार डरती है, पुलीस को आगे करती है', 'निवडणूक आयोग भाजपाची शाखा आहे', 'लोकशाही नाही हुकुमशाही आहे', अशा प्रकारच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

या आंदोलनात मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्ष झिनत शबरीन, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ब्रिज दत्त, राणी अग्रवाल, जोजो थॉमस, प्रकाश सोनावणे, श्रीरंग बरगे, विश्वजित हाप्पे, मनिष गणोरे, झीशान अहमद, राजा ठाकूर, श्रुती म्हात्रे, डॉ. मनिष पाटील, राहुल पिंगळे, नवीन सिंग यांच्यासह शेकडो पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी काँग्रेस मुख्यालय टिळक भवनला पोलिसांनी मोठा फौजफाटा तैनात केला होता. निवडणूक आयोग भाजपा सरकारच्या हातातले कळसुत्री बाहुली बनले असून सत्ताधारी पक्षाच्या इशाऱ्यावर काम करत आहे. मिनाक्षी नटराजन यांचा अर्ज रद्द करण्याचे कोणतेही कायदेशीर कारण नाही, कोणताही एफआयआर त्यांच्यावर नाही, तरिही एका खोट्या आक्षेपाची दखल घेत मिनाक्षी नटराजन यांचा अर्ज बाद करण्यात आला. निवडणूक आयोग व भारतीय जनता पक्ष यांची अभद्र युती असून असे प्रकार भारतीय लोकशाही व संविधानाला अत्यंत घातक आहेत.

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३५९

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. ३८० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख फारूख शेख अमिरसाब देगलूर नाका नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ३८० वार्ड न. १९ माजीद खान हमीदखान पठान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १२९७/२०२६ दि. ०६/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. ४,
पश्चिमेस – प्लॉट क्र. ६,
दक्षिणेस – कॉलनी रस्ता,
उत्तरेस – नूरजहाँ बेगम शेख लाल यांची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३५८

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. ११८ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मोसीन मोहम्मद यासीन व इतर मुर्तुजानगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ११८ वार्ड न. १४ शेख इमरान शेख खासीम यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७७८/२०२६ दि. ०३/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. ८,
पश्चिमेस – पांदन रस्ता,
दक्षिणेस – प्लॉट क्र. ६,
उत्तरेस – प्लॉट क्र. १४.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३५७

नाव परिवर्तन वार्ड क्र. १० मालमत्ता क्र. ३१९/१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख जमीर शेख महेबुब हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ३१९/१वार्ड न. १० शाहीर बेगम शेख सत्तार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ----/---- दि. ०६/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – शेख मुद्दसीर,
पश्चिमेस – शाहीन बेगम शेख सत्तार, दक्षिणेस – शाहीन बेगम शेख सत्तार,
उत्तरेस – रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३५६

नाव परिवर्तन वार्ड क्र. १० मालमत्ता क्र. ३१९/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख जमीर शेख महेबुब हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ३१९/२ वार्ड न. १० शेख मुद्दसीर शेख सत्तार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ----/---- दि. ०६/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – शेख इरफान शेख मोहम्मद, पश्चिमेस – शाहीन बेगम शेख सत्तार, दक्षिणेस – शाहीन बेगम शेख सत्तार,
उत्तरेस – रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## मार्कमेमो हरवला

माझा कोमल दिलीप वाघमारे या नावाचा बी.एसस्सी. नर्सिंग अंतिम वर्ष पासचा मार्कमेमो आयटीआय कॉर्नर ते शिवाजीनगर ऑटो प्रवास करत असताना हरवला आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. मु.पो. कृष्णूर ता. नायगाव जि. नांदेड**
**मो.नं. ९०२२४०६८२७**

## Change In Name

My Old Name is **SHAIKH ABDUL REHMAN AMJAD** which now I am changing as New Name **ABDUL REHMAN SHAIKH AMJAD** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - H.No. 59-2-58, Galli No. 01, Dulheshah Rehman Nagar, Mehmood Khan Garden, Shivajinagar Shivajinagar Nanded Maharashtra 431602

## Change In Name

My Old Name is **THAKUR AKSHAYKUMAR GANESHSINH** which now I am changing as New Name **AKSHAY SINGH GANESH SINGH** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - 390 Near Muk-badhir School, Maganpura, Nanded Maharashtra 431601
Mo.No. 8888388245

अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित,

## नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेड

**इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !!!**

**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.**

**कनिष्ठ महाविद्यालय** : (11वी व 12वी)
कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रम
Crop Sci., Computer Sci., Electronic विशेष सुविधा

**पदवीस्तर अभ्यासक्रम:**

- कला (B.A.)
- वाणिज्य (B.Com.)
- विज्ञान (B.Sc.)

**:पदव्युत्तर अभ्यासक्रम :**

- कला : संस्कृत, लोकप्रशासन, राज्यशास्त्र
- वाणिज्य : एम. कॉम.
- विज्ञान : भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, पर्यावरणशास्त्र

**:संशोधन केंद्र :**

- कला : संस्कृत, लोकप्रशासन
- विज्ञान : भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, पर्यावरणशास्त्र

**: महाविद्यालयाची वैशिष्ट्ये:**

✓ अनुभवी व पात्र प्राध्यापकवर्ग
✓ सुसज्ज ग्रंथालय व प्रयोगशाळा
✓ संगणक व इंटरनेट सुविधा
✓ क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम
✓ करिअर मार्गदर्शन व प्लेसमेंट सुविधा

**प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे:**

- गुणपत्रिका (मार्कशीट)
- शाळा सोडल्याचा दाखला
- आधार कार्ड प्रत
- जातप्रमाणपत्र
- पासपोर्ट आकाराचे फोटो
- ABC ID आपार आयडी

**पत्ता :**
**नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तारासिंह मार्केट जवळ, वजीराबाद, नांदेड**

**संपर्क:**
**प्रो.डॉ. जे. एस.मसुरे** प्रवेश समिती प्रमुख
9763123122
**प्रा.के. जे. कांबळे** कला शाखा
9405775785
**प्रो.डॉ. एस.ए. विभुते** वाणिज्य शाखा
9422877000
**प्रा. डॉ. ए.आर. मेश्राम** विज्ञान शाखा

**कनिष्ठ महाविद्यालय व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी संपर्क**
**प्रा.डॉ. ए.एस. भवानकर** - उपप्राचार्या
**प्रा. के.आर. बा-हाळीकर, प्रा. शिराढोणकर**
**7385204478 , 9011144501**
**Email : abssned@gmail.com**
**nsb_college_nanded@yahoo.com**
**Website : www.nsbcn.org**

**आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आजच प्रवेश घ्या !**

## Change In Name

My Old Name is **SK. M. RIYAJ M. IBRAHIM** which now I am changing as New Name **MOHAMMAD RIYAZ MOHAMMAD IBRAHIM** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - Shri Nagar, Nanded
Mo.No. 9822619097


## Change In Name

My Old Name is **SHAIKH ABDUL REHMAN AMJAD** which now I am changing as New Name **ABDUL REHMAN SHAIKH AMJAD** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - H.No. 59-2-58, Galli No. 01, Dulheshah Rehman Nagar, Mehmood Khan Garden, Shivajinagar Shivajinagar Nanded Maharashtra 431602


## कागदपत्र हरवले

माझी ऋषिकेश विनायकराव मोरे या नावाचे स्थापत्य अभियांत्रिकी पदविका चे प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्षाचे गुणपत्रक तसेच पदविका प्रमाणपत्र, चिखली ते उस्माननगर प्रवासात हरवले आहे. तरी कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती.

**संपर्क पत्ता – ऋषिकेश विनायकराव मोरे**
**मु .अंचोली पो. कोलंबी ता. नायगाव जि. नांदेड**
**मो. नं. ९५७९७४३७७७**

जय जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
वसराम आदुनाईक मागासवर्गीय वसतिगृह निराळा तांडा
ता.किनवट जि.नांदेड मान्य संख्या २०+४=२४

## प्रवेश देणे चालू आहे.

५ ते १० वी विद्यार्थ्यांना शासनमान्य अनुदानित वसतिगृहात सन २०२६-२०२७ शैक्षणिक वर्षात जातीनिहाय विहित टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.
टिप : विनामूल्य प्रवेश देण्यात येईल.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी.) | ६७ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | १४ टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी. | १७ टक्के |
| ४ | विशेष मागास प्रवर्ग एस.बी.सी. | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग ओबीसी | १५ टक्के |
| ६ | आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्ग ओपन | ५ टक्के |

१) प्रशस्त इमारत २) खेळाचे मैदान ३) मुबलक पाण्याची सोय ४) विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष ५) सुसज्ज ग्रंथालय ६) निसर्गरम्य वातावरण ७) नियमित अभ्यास ८) लाईटची व्यवस्था ९) दररोज योगासने व व्यायाम १०) विशेष मार्गदर्शन गरजू व गरीब विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा आवश्य लाभ घ्यावा.

अध्यक्ष/अधिक्षक
वसराम अदुनाईक मागासवर्गीय वसतिगृह
निराळा तांडा ता.किनवट जि.नांदेड
९९२१३९१४३९/९५२७५९०६६२

ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥

ਤਖ਼ਤ ਸੱਚਖੰਡ ਸ੍ਰੀ ਹਜ਼ੂਰ ਅਬਿਚਲਨਗਰ ਸਾਹਿਬ, ਨੰਦੇੜ- ੪੩੧ ੬੦੧ (ਮਹਾਰਾਸ਼ਟਰ)-ਭਾਰਤ

Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431 601 (Maharashtra) - India

Ph.No. 02462-234813, 241266, 243559
E-Mail:- contact@hazursahib.com roombooking@hazursahib.com Visit us at :- http://www.hazursahib.com

No. .................... Date....................

गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुर अबचलनगर साहीब नांदेड

**जाहीर निविदा**

सर्व लोखंड विक्रेते व्यापारी बंधुना सुचित करण्यात येते की, गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुर अबचलनगर साहीब नांदेड मालकीचे इमारत करिता दैनंदिन मेंन्टनस डिर्पाटमेंन्टली नवनिर्माण कार्यासाठी टी.एम.टी.बार व बायडींग वायर ( एकत्रित वजन 3 टन ) खरेदी करावयाचे असुन गेज अनुसार वेगवेगळया स्वरुपात दर नमुद करुन सिलबंद लिफाफयात दि.-15-06-2026 रोजी कार्यालयीन वेळेत "अधिक्षक" गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुर अबचलनगर साहीब नांदेड यांच्या नांवे कार्यालयात पोहचतील या बेताने किंवा समक्ष आणुन दयावे.

Steel TMT-FE-500 Reinforcement Bars - 6mm, 8 mm, 10mm, 12mm,16mm,20mm, & Binding Wire

TMT Bar shall confirm to IS specifications and,be free from rust, defects and other imperfections.

नियम व अटी :-

1. वरिल साहित्याचे दर साईट डिलेव्हरी/लोडींग अनलोडींग,हमाली, कटींग सर्व कर गृहीत धरुन निविदेत नमुद करावे.
2. कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार "अधिक्षक" तख्त सचखंड गुरुद्वारा अबचलनगर साहीब नांदेड कडे राखीव आहेत.
3. अधिक माहीती साठी इंजीनिअरींग विभागाशी संपर्क साधवा.

अधिक्षक
गुरुद्वारा सचखंड बोर्ड,नांदेड.


ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥

ਤਖ਼ਤ ਸੱਚਖੰਡ ਸ੍ਰੀ ਹਜ਼ੂਰ ਅਬਿਚਲਨਗਰ ਸਾਹਿਬ, ਨੰਦੇੜ- ੪੩੧ ੬੦੧ (ਮਹਾਰਾਸ਼ਟਰ)-ਭਾਰਤ

Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431 601 (Maharashtra) - India

Ph.No. 02462-234813, 241266, 243559
E-Mail:- contact@hazursahib.com roombooking@hazursahib.com Visit us at :- http://www.hazursahib.com


No. .................... **TENDER NOTICE.** Date....................

**TILE WORK.**

The Superintendent Gurudwara Sachkhand Board,Nanded invites open Tender for Departmental Work for Supply 8- 10mm thickness premium quality vitrified Tiles in quantity Wall Tiles of size 1'x1'6" Work for Sahebjada Baba Fateh Singh Ji Mangal Karyalaya.Abchalnagar Sahib Nanded for an area of 5000 sqft.

Manufacturers and Dealers, local Supplier, Retailers of Tiles and Building Materials are hereby informed to submit their sealed quotations indicating rate per sqft. for supply of Vitrified Tiles Quote the rate along with taxes Loading, Unloading and Delivery at site.

Submit the quotation with effect from Dt.12-06-2026 to 17-06-2026 upto 5.00 pm. during Office hours at Office of the Superintendent Gurudwara Sachkhand Board,Nanded

**Note :-**
Right of Rejection any or all quotations is there to reserved without asserting any references,with the Superintendent Gurudwara Sachkhand Board,Nanded

Superintendent,
Gurudwara Sachkhand Board,Nanded.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# थकित पीक विमा नुकसान भरपाई तत्काळ वितरित करा

## ◆ आ. बोंढारकर यांची कृषिमंत्र्यांकडे मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** – शेतकऱ्यांचा थकीत पीक विमा त्वरित वितरित करावा, अशी मागणी आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली आहे. सन २०२५-२६ च्या खरीप हंगामातील मंजूर पीक विमा नुकसानभरपाईची उर्वरित रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात तत्काळ जमा करण्याची मागणी केली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मंजूर झालेल्या नुकसानभरपाईपैकी मोठ्या प्रमाणावर रक्कम वितरित करण्यात आली असली तरी अद्याप काही रक्कम प्रलंबित आहे. विशेषतः सोयाबीन, मूग, उडीद, तूर आणि इतर खरीप पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना उर्वरित नुकसानभरपाईची प्रतीक्षा आहे.

निवेदनात आ. बोंढारकर यांनी नमूद केले आहे की, अवकाळी पाऊस व प्रतिकूल हवामानामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, आगामी हंगामासाठी बियाणे, खते व शेतीच्या इतर कामांसाठी आर्थिक मदतीची नितांत गरज आहे. त्यामुळे राज्य शासनाने मंजूर केलेली उर्वरित विमा रक्कम विमा कंपनीमार्फत तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. आ. आनंदराव बोंढारकर हे शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने पाठपुरावा करत असून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू असल्याचेही कृषी मंत्र्यांनी सांगितले.

## नांदेडचा श्रेयस जागतिक योग चॅम्पियनशिपचा विजेता



**नांदेड (प्रतिनिधी)** – गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे दि. ४ ते ८ जून दरम्यान संपन्न झालेल्या पहिल्याच जागतिक योगासन स्पर्धेत नांदेडचा भूमिपुत्र श्रेयस विद्या दिलीप मार्कंडेय याने भारताचे प्रतिनिधित्व करत हँड बॅलन्स या प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले.

एकूण १८ आंतरराष्ट्रीय प्रतिस्पर्ध्यांसमोर कठीण योगासनांची प्रभावी प्रात्यक्षिके सादर करून त्यांनी सुवर्णपदक पटकावले आणि विश्वविजेता हा बहुमान मिळविला. जगभरातील ७३ हून अधिक देशांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता.

भारताचा गौरव वाढविताना नांदेड आणि नांदेडकरांची मान अभिमानाने उंचावणाऱ्या श्रेयस मार्कंडेय यांचे योगाचार्य नांदेड योग रत्न भूषण सीताराम सोनटक्के गुरुजी व नित्य योग सेवा समितीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

## डीआयजी शहाजी उमाप यांच्या पथकाची कारवाई

# लातूर व नांदेड जिल्ह्यातील धाडीमध्ये १ कोटी ४२ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)** – परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी लातूर जिल्ह्यात पोलीस पथकाची रवानगी केली होती. या पथकाने लातूर तसेच नांदेड जिल्ह्यातील कारवाईत १ कोटी ४२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



या पथकाने दि. ९ जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथे गांधी चौकातील मटका बुक्कीवर कारवाई करत, २८ हजार ४४० रुपयांची रोकड व ४० हजार रुपयांचे ४ मोबाईल जप्त केले असून, नमूद प्रकरणात एकूण ७ आरोपीतांना ताब्यात घेऊन त्यांचेविरुद्ध रेणापूर पोलीस ठाणे येथे गुरनं २७१/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

उपरोक्त कारवाई सोबतच विवेकानंद पोलीस ठाणे हद्दीत नवीन रेणापूर नाका येथील योगेश बनसोडे यांचे शेडमध्ये, कल्याण मटका चालू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत ३७ हजार ६८० रुपयांची रोकड व ७२ हजार रुपयांचे ३ मोबाईल जप्त केले आहेत. या प्रकरणात एकूण ८ आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द विवेकानंद पोलीस ठाणे येथे गुरनं ४२९/२०२६ कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या दरम्यान सदर पथकाने लोहा पोलीस ठाणे हद्दीत नांदेड -अहमदपूर रोडवर वाळूची अवैधपणे वाहतूक करणाऱ्या ३ हायवांविरुद्ध तर पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण हद्दीत एका हायवा विरुद्ध कारवाई करत ८ आरोपींविरुद्ध लोहा व नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ३०३ (२), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अन्वये गुन्हे नोंदविले असून, त्यांच्याकडून ४ हायवा व २० ब्रास वाळू असा एकूण १ कोटी ४१ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त चारही कारवायांत पोलीस पथकाने एकूण १ कोटी ४२ लाख ७८ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, २३ आरोपीतांविरुद्ध वरीलप्रमाणे ४ गुन्हे नोंद केले आहेत.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. संजीव जिंकलवाड, पोकॉ. गणेश धुमाळ व पोकॉ. कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

# क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)** –थोर क्रांतिकारक, क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त समरसता मंच, जिल्हा नांदेडच्यावतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांच्या संघर्षमय जीवनकार्याचे स्मरण करून आदिवासी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव केला.

याप्रसंगी समरसता मंचाचे जिल्हा संयोजक राजेश मांजरमकर यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या राष्ट्रभक्तीपूर्ण व समाजोन्नतीच्या कार्याची माहिती देत, त्यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता अधोरेखित केली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी ज्येष्ठ स्वयंसेवक अरुण जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास समरसता मंचाचे कार्यकर्ते माणिक भोसले, हणमंत टेकाळे, सुदाम पाठक, दत्ता तालकोकुलवार, सुनील अर्धापूरकर, जनार्दन वाकोडकर, प्रा. मुंडे, प्रा. हरनावळे, अनिल डोईफोडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# नांदेड परिक्षेत्रात धाडसत्र : परभणीत ४ किलो गांजा व गुटखा जप्त, ४२३ पानटपऱ्यांची झाडाझडती

**नांदेड (प्रतिनिधी)** –पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. १ ते ३० जून २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबविण्याचे निश्चित केले असून, परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

या मोहिमेच्या नवव्या दिवशी, परभणी जिल्ह्यातील नवा मोंढा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजा विक्री करणाऱ्या एका इसमाविरुद्ध एनडीपीएस कायद्याखाली गुन्हा नोंदवून पोलिसांनी त्यास गजाआड केले आहे. या आरोपीकडून ८२ हजार ४०० रुपयांचा ४ किलो १२० ग्रॅम वजनाचा गांजा हस्तगत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे गंगाखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुटखा विक्री करणाऱ्या आरोपीकडून ५५ हजार १८०-रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले असून त्याचेविरुद्ध कलम १२३ बी.एन.एस. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

उपरोक्तप्रमाणे दाखल दोन गुन्ह्यांत पोलिसांनी आरोपींकडून एकूण १ लाख ३७ हजार ५८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. उपरोक्त प्रकरणी अंमली पदार्थांविरुद्ध NDPS कायद्यान्वये करण्यात आलेल्या कारवाईसाठी २० वर्षापर्यंतच्या कारावासाची, तर कलम १२३ बी.एन.एस. अन्वये करण्यात आलेल्या कारवाईसाठी १० वर्षापर्यंतच्या कारावासाची शिक्षा असून, दोन्ही प्रकरणात द्रव्य दंडाच्या शिक्षेचा देखील समावेश आहे.



**पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम :** गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची पानटपऱ्यांवरून होणारी विक्री थांबविण्यासाठी पोलिसांनी पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम हाती घेतली असून, काल दिवसभरात नांदेड परिक्षेत्रात एकूण (४२३) पान टपऱ्यांची तपासणी करण्यात आली आहे. परिक्षेत्रात, गुटख्यासोबतच अंमली पदार्थांच्या साठवणुकीची संभाव्य ठिकाणे देखील तपासण्यात येत आहेत.

## इकडचं तिकडचं

### ईमानात चोरी व्हत नसती व्हय रं...

नीट पेपरफुटीनंतर री-नीटची प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्रावर लष्कराच्या विमानाने पाठवणार असल्याची बातमी काही दिवसांपूर्वीच सगळीकडे प्रकाशित झाली होती. इंटरनेटमुळे जग जवळ आलंय. कुठलीही बातमी क्षणार्धात गल्लीबोळात अन् खेड्यापाड्यांत पोहोचत आहे.

२१ जूनच्या री-नीटसाठी हवाई दलाच्या हेलिकॉप्टरने प्रश्नपत्रिका प्रवास करणार ही बातमी आज सर्व वृत्तपत्रांत प्रकाशित झाली. एका कार्यक्रमानिमित्त सकाळीच वारंग्याला गेलो होतो. परतीच्या प्रवासात भोकरफाट्याजवळील एका रसवंतीवर उसाचा रस घेण्यासाठी आम्ही थांबलो. तिथे विद्यार्थ्यांचा एक घोळका याच बातमीवर चर्चा करत होता.

नीटचा पेपर सेट करणाऱ्या कुलकर्णी मास्तरांनीच हस्तलिखित पेपर फोडला आणि विलक्षण स्मरणशक्ती लाभलेल्या मास्तरीन मनीषाबाईने छपाईला जाण्याआधीच तो फोडला. मग लष्करी विमानातून छापील प्रश्नपत्रिका पाठविण्याचा काय फायदा? असा त्या चर्चेचा सूर होता. एक तरूण सरकारवर लाखोली वाहात प्रश्नपत्रिकेची विमानवारी म्हणजे जनसामान्यांनी भरलेल्या कराचा वेडेपणातून केलेला अक्षम्य अपव्यय असल्याचे तावातावाने सांगत होता. एवढा वेळ बाजूला शांत बसलेला शेतकरी उठला अन् त्या पोरांकडे जाऊन विचारू लागला, ईमानात चोरी व्हत नसती व्हय रं पोरांनो..? सरकार नेहमीच 'रोग हाल्याला अन् इंजाक्शन पखालीला' असं वागतंय बगा.!

रसाचे बील देऊन नांदेडला पोहोचेपर्यंत त्या अनाडी शेतकऱ्याचे शब्द कानात घुमत राहिले, 'रोग हाल्याला अन् इंजेक्शन पखालीला'. ईमानात चोरी व्हत नसती व्हय रं..?

**– शिवाजीराजे पाटील बाभळीकर**

पान १ वरून...

**शरद पवारांच्या...**

मोठा त्याग होता. इंदिराजींनी देशाच्या प्रतिष्ठेशी कधीही तडजोड केली नाही. जगात भारताची पत त्यांनीच वाढवली. शीख समाज हा देशाचा अत्यंत महत्त्वाचा भाग असून, लष्करासह प्रत्येक क्षेत्रात ते हिमतीने जबाबदारी पेलतात.

# आम्ही टाकाऊ नाही, ज्येष्ठ आहोत; 'लाडके मायबाप' योजना तातडीने सुरू करा -डॉ. हंसराज वैद्य

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे आणि त्यांच्या सन्मानपूर्वक जीवनाच्या हक्काकडे राज्य सरकारने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी ज्येष्ठ समाजसेवक तथा फेस्कॉमचे उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी केली.

ज्येष्ठ नागरिकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि घटनात्मक हक्कांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग, फेसकॉम नांदेडच्या वतीने बुधवार, दि. १० जून रोजी सकाळी ११ वाजता नांदेड येथे शांततापूर्ण नागरी हक्क संरक्षण लक्षवेधी मूक जनजागरण पदयात्रेचे (फेरीचे) आयोजन करण्यात आले होते. डॉ. हंसराज वैद्य यांनी जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन व संबंधित विभागांना निवेदन दिले. विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने लावण्यात आलेली आचारसंहिता संपूर्णपणे पाळत ही जनजागरण पदयात्रा काढण्यात आली.

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध न्याय्य मागण्यांच्या पूर्ततेसाठी बुधवारी सकाळी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर शांततापूर्ण 'मूक निवेदन पदयात्रे'चे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील विविध तालुक्यातून आलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी या आंदोलनात सहभाग नोंदविला.



आंदोलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. त्यानंतर डॉ. हंसराज वैद्य यांच्या नेतृत्वाखाली सर्व ज्येष्ठ नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मोर्चा वळवला. शहरात कलम १४४ (जमाबंदी) लागू असतानाही, सुप्रीमकोर्टाने घालून दिलेल्या सर्व नियम व अटींचे पालन करत शांततेत ही पदयात्रा पार पडली.

यावेळी बोलताना डॉ. वैद्य यांनी शासनाच्या भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त करत सांगितले की, आम्ही अनेक वर्षांपासून ज्येष्ठ नागरिकांच्या विविध मागण्या शासनापुढे मांडत आहोत. मात्र शासनाकडून अपेक्षित संवेदनशीलता दिसून येत नाही. महिलांसाठी 'लाडकी बहीण' योजना सुरू करण्यात आली, त्याच धर्तीवर वयोवृद्धांसाठी 'लाडके मायबाप' योजना सुरू करून प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला दरमहा पाच हजार रुपये मानधन देण्यात यावे. वाढत्या महागाईच्या काळात दोन वेळच्या अन्न, पाणी आणि औषधोपचाराची किमान गरज भागविण्यासाठी ही मदत अत्यावश्यक असल्याचे म्हटले.

यावेळी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी वयोमर्यादा ६५, ७० किंवा ७५ वर्षे न ठेवता ती सरसकट ६० वर्षे करण्यात यावी. आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्तींऐवजी फक्त विस्थापित, दुर्लक्षित उपेक्षित, वंचित, गरीब, गरजवंत, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कामगार विधवा महिला तथा दिव्यांग जेष्ठ नागरिकांना प्राधान्याने मानधनाचा लाभ देण्यात यावा यांसह अन्य मागण्यांचा पाठपुरावा करण्यात आला.

## गुंडेराव चेरेकर यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –सिडको परिसरात गेल्या ५० वर्षांपासून वास्तव्यास असलेले व सिडको भूषण पुरस्कार प्राप्त गुंडेराव तुळशिराम चेरेकर यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी अल्पशा आजाराने सिडको येथील निवासस्थानी निधन झाले आहे.



त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातू, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर ११ जून रोजी स. ११.३० वा. सिडको येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# ग्रामपंचायतीतील आपले सरकार सेवा केंद्रांमधून आता ५०० हून अधिक शासकीय सेवा उपलब्ध

## सर्व केंद्रे अद्ययावत करण्याचे सीईओ मेघना कावली यांचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)** – ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा व प्रमाणपत्रे गावपातळीवरच उपलब्ध व्हावीत, यासाठी ग्रामपंचायतींमधील आपले सरकार सेवा केंद्रे अद्ययावत करून पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिले आहेत.

पूर्वी या केंद्रांमध्ये मर्यादित स्वरूपातील सेवा उपलब्ध होत्या. मात्र आता महा ऑनलाईनचे सर्व अधिकार ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांना प्राप्त झाले असून महसूल विभागासह विविध विभागांच्या ५०० हून अधिक शासकीय सेवा गावपातळीवर उपलब्ध होणार आहेत.

या सेवांमध्ये उत्पन्न, रहिवासी, जात, नॉन-क्रिमिलेयर, अल्पभूधारक, राष्ट्रीयत्व, जन्म, मृत्यू, विवाह प्रमाणपत्र, नमुना-८ उतारा आदी विविध दाखले व प्रमाणपत्रांचा समावेश आहे. तसेच पीक विमा, महाडीबीटीवरील अर्ज, मतदार नोंदणी, पॅन कार्ड अर्ज, आयुष्मान कार्ड, सातबारा उतारा, विविध शासकीय अनुदान योजना, वीज व पाणी बील भरणा, बँकिंग सुविधा, शिष्यवृत्ती अर्ज, बांधकाम कामगार नोंदणी तसेच रेल्वे व बस आरक्षण आदी सेवाही या केंद्रांमार्फत उपलब्ध होणार आहेत. या उपक्रमामुळे नागरिकांना तहसील कार्यालय, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची आवश्यकता राहणार नाही. नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होऊन शासकीय सेवा अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होतील.

> महा ऑनलाईनचे प्राप्त झालेले आयडी व पासवर्ड तातडीने कार्यान्वित करून ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रे पूर्ण क्षमतेने सुरू करावीत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सर्व ग्रामपंचायतींना पत्र पाठविण्यात आले आहे. नागरिकांना विविध शासकीय सेवा वेळेत, सुलभपणे व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तत्काळ कार्यवाही करावी.

नांदेड जिल्ह्यातील १,३१० ग्रामपंचायतींमध्ये संगणक चालकांची नियुक्ती करण्यात आली असून प्रत्येक ग्रामपंचायतीला महा ऑनलाईनचे नवीन आयडी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. संबंधित आयडी व पासवर्ड कार्यान्वित करून सेवा केंद्रे पूर्ण क्षमतेने सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर महाआयटीचे जिल्हा प्रकल्प प्रमुख कुलदीप जोशी तसेच राष्ट्रीय ग्रामीण स्वराज्य अभियानाचे जिल्हा व्यवस्थापक माधव देवडे हे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com